# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र





०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. ६८७/जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र, पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक ३१/१२/२०१८

नववर्षाच्या स्वागतासाठी वाहतुक नियत्रंण शाखा भंडारा व भंडारा जिल्हा पोलीस दलाकडून 'नववर्षाचे स्वागत करा दुग्धपानाने, ना की मद्य प्राशनाने' या आगळयावेगळया उपक्रमाचे आयोजन कलेक्टर ऑफीस चौक याठिकाणी करण्यात आले. या उपक्रमाच्या निमीत्ताने पोलीसांनी मोटार वाहन चालकांना मसाला दुधाचे वाटप करुन त्याप्रमाणे वाहतुकीच्या नियमाबाबतची माहीती पत्रके वाटप करुन नागरीकांनमध्ये मद्यप्राश करुन मोटार वाहन चालविण्यामुळे होणारे मोटार वाहन अपघात व त्यामुळे होणारे दुष्परिणाम याबाबत जनजागृती करण्यात आली. याप्रसंगी मा. जिल्हा पोलीस अधिक्षक विनीता साहू यांनी नागरीकांना वाहतुक नियमांचे पालन करुन पोलीसांना सहकार्य करण्याचे आवाहन केले असून नविन वर्षाच्या हार्दीक शुभेच्छा दिलेल्या आहेत.

सन २०१७ च्या आकडेवारीनुसार देशामध्ये एकुण ४,६४,००० मोटार वाहन अपघात घडून आले, असून त्यामध्ये १,४७,००० व्यक्ती मृत्यु पावलेले आहेत. व मृत्यु पावलेल्या मध्ये वयोगट १८ ते ४५ या वयोगटातील तरुणांचे प्रमाण ७२ टक्के असून बहुतांश मोटार वाहन अपघातातील मृत्यु हे भरधाव वेगाने मोटार वाहन चालविल्यामुळे व हेल्मेंटचा वापर न केल्यामुळे घडून आलेले आहेत.

भंडारा जिल्हयाचा विचार करता सन २०१८ मध्ये भंडारा जिल्हयात वर्षभरात एकुण ४०६ मोटार वाहन अपघात झालेले असून त्यामध्ये १४८ व्यक्ती मृत पावलेल्या आहेत. यातील ९० टक्के मृत्यु हे डोक्यास गंभिर दुखापत पोहचल्याने झालेले असून जर हेल्मेंटचा वापर झाला असता तर हे सर्व मृत्यु टाळता येणे शक्य झाले असते. याशिवाय एकुण ४८६ व्यक्ती हे गंभिररित्या दुखापत ग्रस्त झालेले आहेत. व त्यामधील काही व्यक्तींना कायमस्वरुपी अंपगत्व आलेले आहे.

जागतीक आरोग्या संघटनेच्या सन २०१५ मध्ये ब्राझील येथे झालेल्या अधिवेशनामध्ये सन २०२० पर्यत रस्ते अपघात व त्यामध्ये होणारे मृत्यु यांचे प्रमाण ५० टक्क्या पर्यत कमी करण्याचे उदिष्ट ठरवण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाने मोटार वाहन अपघाताबाबत अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या राधाकृष्णन समितीने देखील देशामध्ये मोटार वाहन अपघात व अपघाती मृत्यु यांचे प्रमाण वार्षीक १० टक्यांनी कमी करण्याचे लक्ष ठरवुन दिलेले आहेत. त्याबाबतच्या सर्व सुचना शासनाकडून जिल्हयाधिका–यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा रस्ता सुरक्षा समितीस प्राप्त झालेले असून जिल्हा रस्ता सुरक्षा समितीकडून भंडारा जिल्यहामध्ये ज्याठिकाणी वारवांर अपघात होतात. अश्या ठिकाणे **'ब्लॅक स्पॉट'** म्हणुन निश्चीत करण्यात आलेले असून तेथे पुन्हा अपघात होवू नयेत म्हणुन पोलीस, आरटीओ, पीडब्लुडी, व महामार्ग प्राधिकरण यांचेकडून विवीध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणुन पोलीस, आरटीओ महामार्ग सुरक्षा पथक यांचेकडून हेल्मेंट सक्ती, सिटबेल्टचा वापर याबाबत जनजागृती करण्यात येत असून याबाबत असलेल्या कायदयातील तरतुदींची काटेकोरपणे अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली आहे.

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता